( सोबत महाराष्ट्र राज्यातील धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक चालविण्यांत येणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना अवलंबण्यांच्या कार्यपध्दती ,अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करणेबाबत — शासन , अल्पसंख्यांक विभाग , परिपत्रक क्रमांक— अशैस—२०१२/प्र.क्र. —२१/कार्या—५, दि. १८/०६/२०१४ )

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
क्रमांक::— १०/एनजीपी/२०१४/माहिती/६४४, /12551
दिनांक :— - 7 AUG 2014

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित:

१. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय , अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी / पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात येवून शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

२. प्रोग्रामर , यांना सदर परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांकरिता.

(गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

महाराष्ट्र राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

अल्पसंख्याक विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

दिनांक : १८ जून, २०१४

**वाचा:- शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५ दिनांक २७.०५.२०१३**

**प्रस्तावना :-**

राज्यातील अल्पसंख्यांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जा प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती, अटी व शर्ती संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना प्रदान केलेल्या संबंधित धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने वारंवार उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थाकडून संदर्भाधिन शासन निर्णयातील कार्यपध्दती, अटी व शर्ती या मध्ये सुधारणा करण्याबाबतची मागणी करण्यात येत होती. याबाबत सर्वकष विचार करुन उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक :-**

प्रवेश भरतीसंबंधी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ च्या भाग "अ" परिच्छेद क्र. १०(iv) येथील (अ) (ब) व (क) मध्ये सुधारणा करण्यात येत असुन हे सुधारीत परिच्छेद खालील प्रमाणे आहेत.

१० (iv) - अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत :- पदवी / पदविका व पुढील अभ्यासक्रमांसाठी खालील प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

I) अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :-अ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

(ब) अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागावर त्यांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेशांमध्ये अग्रक्रम (Priority) देण्यात यावा. जर, संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक ५०% विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, तर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(ii) अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था :- अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थीदेखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(iii) तसेच उर्वरित ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

II विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :- सर्व विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. जर,

संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे ५१% त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक विद्यार्थी उपलब्ध झाले नाही तर, पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

ii) विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

iii) तसेच उर्वरित ४९% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना संबंधित शैक्षणिक संस्थांनी खुल्या प्रवर्गातील तसेच त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष प्रवर्ग इत्यादींना सामाजिक न्याय व समतोल साधण्याकरिता प्रवेश द्यावेत.

वरील प्रमाणे कार्यवाही करताना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भाग "अ" च्या परिच्छेद १०(iv) (ड) मध्ये नमुद केल्याप्रमाणे वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात व जाहिरातीमध्ये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस प्राप्त धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणे तसेच राज्य शासनाने घोषित केलेले राज्यातील अन्य धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून, यथास्थिती, अर्ज मागविण्यात यावेत. उपरोक्त जाहिरातीमध्ये संस्थेस प्राप्त अल्पसंख्याक दर्जाचे विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर, त्यानंतर अन्य अल्पसंख्याक धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्यात येतील, असे नमुद करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०६१८१४५१२४२६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul
Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2014.06.18 14:53:32 +05'30'

श्रीमती अैनुल अत्तार

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रबंधक, अपिलीय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, खंडपीठ नागपूर
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
१०. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
११. धर्मादाय आयुक्त, उच्च न्यायालय, मुंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१६. संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१७. संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२१. निवडनस्ती